# इंदिरा ते निर्भया

वर्षानुवर्षांच्या रूढी परंपरा यात अडकलेल्या भारतीय समाजामध्ये इंग्रज सरकारच्या काळापासून मोठ्या प्रमाणात बंड सुरु झाले. जनमानसाच्या दृष्टीने हा जसा बदलांचा मोठा टप्पा होता, तेवढाच स्त्री सुधारणांच्या दृष्टीने देखील फार महत्वाचा होता. अनेक सुधारकांच्या प्रयत्नातून स्त्री शिक्षण, विधवा पुनर्विवाह, बालविवाह, समान अधिकार अशा अनेक गोष्टींमध्ये बदल होत होते. या सुधारणांना होणाऱ्या प्रचंड विरोधाला न जुमानता हा संघर्ष सुरु राहिला. एकीकडे भारत स्वतंत्र झाला. स्त्री शिक्षणाच्या चळवळीने एव्हाना यशस्वीतेचा झेंडा रोवला होता. स्त्रियांनी नोकरीसाठी बाहेर पडणे, स्वतःचे स्वतंत्र विचार मांडणे, इत्यादी घटनांवरून याची प्रचीती येऊ लागली. इंदिरा गांधी यांनी जेव्हा पंतप्रधान म्हणून सूत्रे हातात घेतली, तेव्हा देशाच्या महत्वाच्या राजकीय पदावर एक महिला विराजमान होणे, हे या चळवळीचे एक मोठे यश होते. स्वातंत्र्योत्तर विकासाकडे भारताचा प्रवास सुरु असतानाच, त्याला समांतर असा स्त्री समानतेचा प्रवास देखील त्याच पथावर सुरु होता. जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात पाय रोवून स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणाऱ्या स्त्रियांचे वाढते प्रमाण बघून भविष्यातील विकसित भारतातील स्त्रिया या स्वतंत्र आणि मुक्त असतील अशा आशा पल्लवित होऊ लागल्या. आज ६० ते ७० वर्षांच्या कालखंडानंतर २०१२ मध्ये घडलेल्या "निर्भया" घटनेने बलात्कार आणि पर्यायाने स्त्रियांवरच्या लैंगिक अत्याचाराचे अत्यंत भीषण आणि दुर्दैवी चित्र समोर आले. अनेक छोट्या मोठ्या घटना ज्या दुर्लक्षित होत्या, वरवर बघता स्वतंत्र आणि मुक्त स्त्रियांना देखील आज किती समस्या आहेत ते या एका घटनेने मोठ्या प्रमाणात दाखवून दिले आणि त्याच वेळी एकूणच स्त्रियांचे स्वातंत्र्य आणि सुरक्षितता याबाबत फार मोठे प्रश्न चिन्ह उभे केले.

७० च्या दशकात स्त्रियांनी शिक्षण घेणे ही बहुतांशी शहरांत, मोठ्या गावात सर्वमान्य गोष्ट होती. शिक्षिका, परिचारिका, बँकिंग, सरकारी कार्यालये अशा क्षेत्रात सुरुवातीला मोठ्या प्रमाणात स्त्रिया दिसू लागल्या. कौटुंबिक जबाबदारी म्हणून अथवा अर्थार्जनाचे साधन म्हणून याकडे सुरुवातीला बघितले गेले. घराच्या चौकटीतून बाहेर येउन नवीन अनुभव घेत, कुणाची पत्नी किंवा कुणाची मुलगी याशिवाय स्त्रीची एक स्वतंत्र ओळख

निर्माण होऊ लागली. जसजसे स्त्री शिक्षणाचे प्रमाण वाढले, तसतसे फक्त औपचारिकता म्हणून शिकण्याशिवाय, आवडीप्रमाणे शिक्षण घेणे याकडे मुलींचा कल वाढत गेला. मुलींच्या लग्नाइतकेच प्राधान्य तिच्या शिक्षणासाठी दिले जाऊ लागले. साधारण ८० च्या दशकात अनेक स्त्रियांनी वैद्यकीय, अभियांत्रिकी, स्थापत्य या क्षेत्रात देखील आपला ठसा उमटवला. याशिवाय स्वातंत्र्योत्तर काळातील या ३-४ दशकांमध्ये अनेक स्त्री लेखिका व कवयित्री जगासमोर आल्या. कौटुंबिक व समाजाच्या टीकेला झुगारून अनेक नायिका पुढे आल्या. वैमानिक, पोलीस, प्रशासकीय सेवा, संशोधन यासारख्या चाकोरीबाहेरच्या क्षेत्रात देखील महिलांनी प्रवेश केला. त्यानंतर आलेल्या औद्योगिक आणि विशेष करून माहिती तंत्रज्ञान क्रांतीने स्त्रियांसाठी अजून मोठे आवार खुले केले. अशा प्रकारे विकसित होणाऱ्या भारतात अनेक क्षेत्रात भरारी मारणाऱ्या स्त्रिया अधिकधिक दिसू लागल्या.

या बदलांना जसे सहजपणे सामावणारे काही होते, तसेच अजूनही पारंपारिक विचारसरणीचा पगडा असल्याने विरोधकही होते. हळूहळू हा लढा केवळ समाज सुधारक, पुढारी यांच्यापुरता मर्यादित न राहता, याच परिस्थितीतून बाहेर पडलेल्या स्त्रिया, शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य यातून आलेला आत्मविश्वास, यातून सर्वसामान्य स्त्रिया देखील स्त्री सबलीकरणासाठी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष यात कार्यरत होऊ लागल्या. सरकारतर्फे निरनिराळ्या योजना राबवण्यात आल्या, विशेष कायद्यांची तरतूद करण्यात आली.

या डोळे दिपवणाऱ्या प्रगतीच्या वाटेवरच हुंडाबळी, सासुरवास, बलात्कार यासारख्या अत्याचारांचे प्रमाण मात्र कमी अधिक प्रमाणात तसेच होते. शहरी आणि ग्रामीण भागातील स्त्रियांच्या आयुष्यातील तफावत देखील बरीच होती. मुलगाच हवा हा अट्टाहास असणाऱ्या घरात सहजपणे वर्षानुवर्षे अपत्य होत गेले. लोकसंख्येचा प्रश्न वाढत गेला, सरकारचे नियम आले आणि मग सुरु झाल्या स्त्री भ्रूण हत्या. ज्या तंत्रज्ञानाने स्त्रियांच्या स्वयंपाक घरात अनेक सोयी उपलब्ध झाल्या, त्याच वेळी वैद्यकीय क्षेत्रातील तंत्रज्ञानाचा गैरफायदा घेऊन गर्भपाताच्या नावाखाली स्त्री भ्रूण हत्येचे प्रमाण वाढले. माजघरात असलेल्या स्त्रीला पूर्वी जिथे फक्त घरातील अत्याचारांना तोंड द्यावे लागायचे, त्यात शिक्षण, नोकरीत मिळणारा दुजाभाव, लैंगिक

अत्याचार, असुरक्षितता या असंख्य अडचणींची भर पडली. नोकरी किंवा व्यवसाय सांभाळत असतानाच स्वयंपाक, मुलांचे पालन पोषण ही पारंपारिक कामे तिच्याच हाती राहिली आणि नोकरदार स्त्रियांची ओढाताण होऊ लागली. अनेक निर्भया आजही बळी पडत आहेत आणि पूर्वीही होत्या परंतु वर्तमानपत्रात कुठल्याशा कोपऱ्यात हरवलेल्या या बातम्या आता ब्रेकिंग न्यूज म्हणून झंझावता सारख्या समोर आल्या आणि संपूर्ण देशाला हादरवून सोडले. त्यानंतर ३ वर्ष होऊनही या केसचा निकाल जेव्हा समोर दिसला, तेव्हा कागदोपत्री स्त्रियांसाठी केलेले कायदे किती तोकडे आहेत हेही दिसले.

भारतासारख्या बहुभाषिक, विविध संस्कृतींचा प्रभाव असलेल्या आणि १०० कोटीहून अधिक लोकसंख्येच्या देशात आजच्या स्त्रीचे प्रश्न कुठल्या दोन शब्दात, वाक्यात सामावणारे नाही. भारतात प्रांतवार प्रत्येक भागातील स्त्रियांबद्दल वेगळे लिहिता येईल. महाराष्ट्रात जशा प्रत्येक क्षेत्रातल्या मुली आघाडीवर दिसतात, तिथेच स्त्री भ्रूण हत्याही घडतात. एकीकडे हरियाणात कित्येकींना कुठले कपडे घालावे, कुणाशी बोलावे हे अधिकार देखील खाप पंचायतीमार्फत हिरावले गेले आहेत आणि अजूनही कौमार्याची परीक्षा द्यावी लागणाऱ्या अभागी स्त्रिया देखील आहेत. बिहार, राजस्थान येथील स्त्रिया अजूनही बुरख्याखाली आहेत. दक्षिणेकडे केरळात मुलींचा जन्मदर सुखावणारा आहे मात्र तिथेच दिसणारा ह्युमन ट्रॅफिकिंग हा प्रकार नजरेआड करण्यासारखा नाही. तीच गत ईशान्य भारतातील स्त्रियांची की ज्यांना भारतीय ही ओळख मिळवण्यासाठी सुद्धा धडपड करावी लागते. प्रत्येक ठिकाणची परिस्थिती इतकी वेगळी आहे की त्या त्या ठिकाणचा लढा, त्याचे स्वरूप आणि आवाका, त्यावर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या समस्या हा एका वेगळ्या चर्चेचा विषय होऊ शकतो.

इंदिरा ते निर्भया दरम्यानचा हा स्त्री सबलीकरणाचा प्रवास अनेक खेदजनक, घटनांनी भरलेला आहे तसाच अत्यंत आनंददायी, सुखकारक घटनांनी देखील आहे. प्रश्नांची मालिका, अडचणींची मालिका सुरूच आहे. पण आजवर घडलेले बदल बघता तर निर्भया सारखी घटना आजही होणे दुर्दैवी आहे. त्याहून पुढे जाऊन यातील आरोपींना दिली जाणारी शिक्षा, बचाव पक्षाकडून केले जाणारे युक्तीवाद हे अजूनच संतापजनक आहेत. आणि त्याच वेळी अभिमानास्पद कामगिरी करून भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर स्त्रिया, अनेक अडचणींचा सामना करूनही पाय रोवून राहणाऱ्या कष्टकरी

वर्गातील खंबीर स्त्रिया यासारख्या अनेक सकारात्मक प्रेरणादायी कहाण्या देखील आहेत. जिथे बायकोने नवऱ्याला "आजच्या दिवस चहा करून घेता का तुमचा?" या प्रश्नाकडेही डोळे वटारून बघितले जाई, तिथेच आज "तू थकली असशील, आज स्वयंपाक मी करतो" हे सहजपणे घडू लागले आहे. नोकरी ही केवळ संसाराला हातभार म्हणून केली जायची, तिथेच आज स्वतःचे छंद, आवडी निवडी यासाठी आवर्जून वेळ काढणाऱ्या स्त्रिया आहेत. गृहिणीने फक्त आणि फक्त घरकामच करावे या मानसिकतेतून बाहेर पडून तिच्याकडेही सन्मानाने स्त्री म्हणून बघण्याचा दृष्टीकोन बदलतो आहे.

या सकारात्मक घटनांकडे पाहिले तर असे दिसते की अनेक स्त्री पुरुषांनी आपापला खारीचा वाटा उचलून, यापैकीच काहीनी पुढाकार घेऊन केलेल्या कार्याचे हे फलित आहे. हे बदल एका दिवसात, एका वर्षात घडलेले नाहीत. ही एक वर्षानुवर्षे चालणारी प्रक्रिया आहे. सध्याच्या भारतात याचा वेग वाढायला हवा हे नक्की पण मागे वळून बघताना हा प्रवास आशादायी आहे, प्रभावित करणारा आहे. अगदी घरातीलच पणजी, आजी ज्या काळात स्त्री मुक्ती, स्त्री समानता हे शब्द रूढ नव्हते, त्यांच्यातील कित्येकींचे आयुष्य हे तरुण पिढीसमोरकुठल्याही उपदेशाविना स्त्री सबलीकरणाचे आदर्श आहे.

महर्षी कर्वे, न्या. रानडे, महात्मा फुले, राजा राममोहन रॉय यांच्यापासून सुरुवात झालेल्या या चळवळीत सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे ते आता सिंधुताई सपकाळ अशा अनेक स्त्रियांनी या लढ्यात महत्वाची भूमिका बजावली. मराठी मालिका, चित्रपट, प्रसार माध्यमे यातून यांचे कार्य महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोहोचले. त्यांच्यासोबतीने रोजच कळत नकळत अनेक स्त्रिया सबलीकरणाचा प्रवास करत आहेत. स्त्रियांना कमी लेखणारा, तिच्यावर घरात अथवा घराबाहेर अत्याचार करणाऱ्या समाजाचा आपण सगळेच एक भाग आहोत. जेव्हा आपल्यापैकी प्रत्येक जण यातून बाहेर पाडण्यासाठी प्रयत्न करेल, तेव्हा होणाऱ्या बदलांना कदाचित अधिक वेगवान स्वरूप येईल. ज्यांना हे स्वातंत्र्य मिळाले आहे, त्यांनी अधिक जबाबदारीने, आपापल्या परीने खारीचा वाटा या लढ्यात देण्याची गरज आहे. अशा सामुदायिक प्रयत्नातून हळूहळू स्त्रियांच्या परिस्थितीत अधिक बदल होतील. भारतात स्त्रियांना सुरक्षितपणे फिरता येईल, आपले

आयुष्य आपल्या आवडीप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक स्त्रीला असेल, आत्मविश्वासाने आणि सन्मानाने वावरणाऱ्या स्त्रिया ही भारतातील स्त्रियांची ओळख होईल असे चित्र भविष्यात दिसू लागेल अशी आशा आहे.

- मधुरा देशपांडे